**नगर परिषद/ नगरपंचायत सार्वत्रिक**
**निवडणूका-२०२५**
**आरक्षण सोडत कार्यक्रम**

सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक -रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.११/का-६
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०००३२.
दिनांक:- ०३/१०/२०२५

विषय:- राज्यातील २४७ नगरपरिषद व ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूका २०२५ आरक्षण सोडत कार्यक्रम

संदर्भ :-१. राज्य शासन, नगर विकास विभाग यांचेकडील अधिसूचना क्र.एमसीओ-२०२१/प्र.क्र.१९२/नवि- १४, दि. १५ डिसेंबर, २०२१
२. या कार्यालयाचे आदेश क्र.रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.१०/का-६, दि.२७ डिसेंबर, २०२१
३. महाराष्ट्र अधिनियम क्र.२०/२०२२, दि.१ फेब्रुवारी, २०२२
४. महाराष्ट्र अधिनियम क्र.२१, दि.११ मार्च, २०२२
५. या कार्यालयाचे आदेश क्रमांक- रानिआ/नप- २०२५/प्र.क्र.०५/का-६, दि.१६ जून,२०२५
६. नगर विकास विभाग, क्र.एमसीओ-२०२५ /प्र.क्र.२४२/नवि-१४, दि.१६ जून २०२५.
७. राज्य निवडणूक आयोगाचे नगरपरिषदेचे क्र.रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.१०(अ)/का-६, व नगरपंचायतीचे क्र.रानिआ/नपं-२०२५/प्र.क्र.१०(ब)/का-६, दि.०३ ऑक्टोंबर, २०२५
८. नगरविकास विकास विभागाचे क्र.एमसीओ-२०२५/प्र.क्र.२९०/नवि-१४, दि.०३ ऑक्टोबर, २०२५

महोदय/ महोदया,

मा. सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल (सी) क्र.१९७५६/२०२१ व त्यासोबत संलग्न याचिकांमध्ये दि.०६/०५/२०२५ व दि.१६/०९/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये नियम ९ च्या पोट- कलम २ व कलम ३४१ (ब) मधील तरतूदीनुसार नगर परिषदाच्या सदस्यांची संख्या निश्चित

करावयाचे अधिकार आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांना आहेत. त्यानुसार नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील सदस्य संख्या राज्य शासनाच्या नगर विकास विभाग, क्र.एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४, दि.१६ जून, २०२५ रोजीच्या आदेशानुसार निश्चित करण्यात आली आहे. तसेच २४७ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींचा प्रभाग रचना कार्यक्रमानुसार अंतिम प्रभाग रचना **दि. ३० सप्टेंबर, २०२५** रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

आता या पत्राद्वारे २४७ नगपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता सदस्यांचे आरक्षण सोडत कार्यक्रम सोबत प्रपत्र-१ मध्ये देण्यात येत आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भीय क्र.७ नुसार नगरपरिषदा व नगरपंचायतींकरीता आरक्षण सोडतीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहे. या मार्गदर्शक सूचना व आरक्षण सोडतीच्या सूचनांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन यांनी विहीत कालावधीत आरक्षण अंतिम करण्याबाबतची कार्यवाही करावी.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

03.10.2025

( सुरेश कांकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

<u>सहपत्र</u> :- सोबतचे प्रपत्र- १

प्रति,
१. प्रधान सचिव(२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, कोकणभवन, बेलापूर, नवी मुंबई.
३. सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन
४. सर्व जिल्हाधिकारी (मुंबईशहर व मुंबई उपनगर वगळून)
५. मुख्याधिकारी, नगरपरिषदा/ नगरपंचायती सर्व
६. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
७. आयोगातील सर्व कार्यासने
८. निवड नस्ती.

## राज्यातील २४७ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूका

### सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम २०२५

(राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.१०/का-६, दि.०३/१०/२०२५ सोबतचे सहपत्र)

**प्रपत्र-१**

| अ.क्र | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे | कालावधी |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारूप आरक्षण** | | |
| १ | आरक्षणाची सोडत काढणेबाबत.. नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती महिला, अनुसचित जमाती महिला व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिला व सर्वसाधारण माहिलांसह) | जिल्हाधिकारी | ०८/१०/२०२५ पर्यंत |
| २ | प्रारूप आरक्षणाची अधिसूचना प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | ०९/१०/२०२५ |
| | **ब) हरकती स सूचना** | | |
| ३ | जिल्हाधिकारी यांचेकडे प्रारूप आरक्षणावर हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी | | ०९/१०/२०२५ ते १४/१०/२०२५ |
| ४ | प्राप्त हरकती व सूचना आधारे अभिप्रायासह प्राप्त गोषवारा विभागीय आयुक्त यांना सादर करणे | जिल्हाधिकारी | १७/१०/२०२५ पर्यंत |
| ५ | प्रारूप आरक्षणावर प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करून आरक्षण अंतिम करणे | विभागीय आयुक्त | २४/१०/२०२५ पर्यंत |
| | **क) अंतिम आरक्षण** | | |
| ६ | अंतिम आरक्षण शासन राजपत्रात प्रसिध्द करणे | मुख्याधिकारी | २८/१०/२०२५ पर्यंत |

टिप:- विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील नोडल अधिकारी यांनी प्रत्येक टप्प्याचा कामकाजाबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

03.10.2025

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र